# पशुसंवर्धन विभाग,जि.प.यवतमाळ

जुनी जि.प.इमारत, सिव्हील लाईन,भावे मंगल कार्यालया समोर,
यवतमाळ, जि.यवतमाळ (महाराष्ट्र) ४४५००१

दुरध्वनी :- ०७२३२ २४२२०३, ई मेल :- dahoyeotmal@gmail.com


## दरपत्रक मागणी, दि.२६.१२.२०१६ (२)

विषय - कुक्कुट खाद्य ( चिक क्रम) खरेदी करण्याकरीता निवीदा मागविण्याबाबत.

उपरोक्त विषयावये पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद, यवतमाळ अंतर्गत कुक्कुट प्रकल्प वाघापुर, यवतमाळ करीता सन २०१५-२०१६ या वर्षाकरीता कुक्कुट खाद्य (चिक क्रम) खरेदी करावयाचे आहे.त्यादृष्ट्रीने कुक्कुट खाद्य (चिक क्रम) प्रति टन च्या दराबाबत निवीदा मागविण्यात येत आहे. कुक्कुट खाद्य हे चागल्या प्रतीचे असावे.

सदर निवीदा दिनांक २७/१२/२०१६ ते ०२ /०१/२०१७ या कालावधी मध्ये शासकीय वेळेत या कार्यालयामध्ये सादर करावी. दिनांक ०२/०१/२०१७ ला दुपारी ५.०० वाजेपर्यंत सिलबंद लिफाफ्या मध्ये जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ याचे नावे सादर करावी. नमुद दिनांकेच्या नंतर प्राप्त निवीदा स्विकारली जाणार नाही.

**अटी व शर्ती** :-

१) चिक क्रॅम खादयाचा प्रति टन दरा मध्ये वाहतुक ,हमाली भराई ,उतराई ,जकातकर ,विक्रीकर इत्यादी सर्व कराचा व खर्चाचा समावेश असावा,कर व वरील खर्च वेगळयाने दिल्या जाणार नाही.

२) पक्षी खादय कुक्कुट प्रकल्प वाघापुर,जि.प.यवतमाळ या ठिकाणी पोहोच करावे लागेल.

३) निविदा मंजुर झाल्या नंतर पुरवठा आदेश दिनांका पासून पक्षी खादय दुस-या दिवशी ते आठ दिवसात पुरवठा करणे बंधकनकारक राहील.

४) निविदा दिनांक ०२/०१/२०१७ रोजी सांय.५.३० वाजता निविदा समिती समोर उघडण्यात येतील,त्या वेळी आपण किंवा आपले प्रतिनीधी हजर राहावे.

५) पुरवठादाराने दर पत्रकावर आपला पॅन क्रमांक व वॅट/सीएसटी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

६) दर पत्रकासोबत निविदाधारकाने पॅन कार्ड झेरॉक्स प्रत सोबत जोडावी.

७) पुरवठादाराने निविदा सादर करतांना खरेदी प्राधिकाऱ्यासोबत हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत आणि एकल निविदा सादर करित असल्याची हमी द्यावी. (खालील प्रमाणे प्रमाणित करावे)

**टिप** :- १) बंद पाकीटावर वरच्या बाजूस ठळक अक्षरात **'दरपत्रके'** असे नमूद करावे.
२) दर मंजूरी संदर्भात अंतिम निर्णय या कार्यालयाने राखून ठेवला आहे.

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,**
**जिल्हा परिषद यवतमाळ.**

---

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यांत येते की, माझे फर्मचा कोणताही हितसंबंध जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जि.प.यवतमाळ कार्यालयाशी नाही. तसेच मी ही एकच निविदा (एकल निविदा) आपले कार्यालयास सादर केलेली आहे.

करिता प्रमाणित करण्यांत येत आहे.

सही/-